जाहिरातीचा मसुदा

महाराष्ट्र शासन

# महिला व बालविकास विभाग

बालन्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ मधील प्रकरण ५ मधील कलम २७ तसेच महाराष्ट्र राज्य बालन्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ मधील नियम १५ (१)मध्ये बालकल्याण समिती गठीत करण्याची तरतूद आहे, बालन्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ च्या नियम १५, नियम ९१ च्या अधीन राहून खालील (अ)मध्ये नमूद जिल्ह्यासाठी सदस्य आणि (ब) मध्ये जिल्ह्याच्या ठिकाणी बालकल्याण समिती अध्यक्ष/सदस्य यांची नियुक्ती करण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ) बालकल्याण समिती जिल्हानिहाय रिक्त पदे**

| अ.क्र. | जिल्हा | सदस्य पदासाठी रिक्त संख्या | अ.क्र. | जिल्हा | सदस्य पदासाठी रिक्त संख्या | अ.क्र. | जिल्हा | सदस्य पदासाठी रिक्त संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सातारा | १ | ९ | धुळे | १ | १७ | चंद्रपूर | २ |
| २ | सांगली | २ | १० | नंदुरबार | १ (महिला फक्त) | १८ | गडचिरोली | २ |
| ३ | सोलापूर | २ | ११ | अमरावती | १ | १९ | औरंगाबाद | १ |
| ४ | मुंबई | २ | १२ | अकोला | २ | २० | जालना | १ |
| ५ | उपनगर | १ | १३ | वाशिम | १ | २१ | हिंगोली | १ |
| ६ | ठाणे | १ | १४ | बुलडाणा | १ | २२ | नांदेड | १ |
| ७ | रायगड | १ | १५ | नागपूर | १ | २३ | उस्मानाबाद | २ |
| ८ | रत्नागिरी | २ | १६ | वर्धा | २ | | | |

**ब) बालकल्याण समिती :** मुंबई उपनगर (वाढीव), सिंधुदुर्ग, यवतमाळ, भंडारा, गोंदिया, पालघर या जिल्ह्यांसाठी (एकूण ५ पदे रिक्त)

- अध्यक्ष १ पद
- सदस्य ४ पदे

**उपरोक्त पदाबाबतचे पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत. त्याचप्रमाणे सदरची व्यक्ती खालील क्षेत्रातील नामांकित, कार्यक्षम व अनुभवी असावी.**

**१)** समिती अध्यक्ष/सदस्यांचे वय अर्जाच्या दिनांकास ३५ वर्षापेक्षा कमी नसावे. **२.** समितीचे अध्यक्ष/सदस्य यांना शिक्षण, आरोग्य, कल्याण कार्याच्या क्षेत्रामधील बालकांसोबत काम करण्याचा किमान सात वर्षांचा अनुभव असेल आणि शिक्षणशास्त्र, समाजशास्त्र किंवा मानसशास्त्रामध्ये पदव्युत्तर पदवी किंवा एम.बी.बी.एस. किंवा कायद्यातील पदवी अशी शैक्षणिक अर्हता असेल. **३.** समितीचे अध्यक्ष/ सदस्य कमाल दोन सत्रापर्यंतच्या, जे सलग नसतील, नियुक्तीस पात्र असतील.

**अटी व शर्ती : १)** वर मुद्दा क्र. १,२ मध्ये नमूद केल्यानुसार वय, शैक्षणिक पात्रता व अनुभव असणे आवश्यक आहे. **२.** अधिनियम व नियमांनुसार अर्जदार हा बालकल्याण समितीच्या कामांकरिता आवश्यक वेळ व पुरेसे लक्ष देऊ शकणार नाही असे एखादे पूर्णवेळ पद धारण करणारा नसावा. **३.** अर्जदार समितीचा सदस्य असण्याच्या त्याच्या कार्यकाळात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणत्याही बालकांची काळजी घेणाऱ्या संस्थेशी जोडलेला नसावा किंवा अशा संस्थेशी त्याचा अन्य प्रकारे हितसंबंध असता कामा नये. **४.** त्याच्या कार्यकाळात तो कोणत्याही राजकीय पक्षाच्या कार्यालयात कोणतेही पद धारण करणारा नसावा. **५.** अर्जदार दिवाळखोर नसावा. **६.** निवडप्रक्रियेपूर्वी सर्व अर्जदारांनी पोलीस विभागाकडून प्राप्त केलेले चारित्र्य प्रमाणपत्र सादर केले पाहिजे. **७.** अर्जदारांना विहित नमुन्यातील हमीपत्रे/संमतीपत्रे देणे बंधनकारक राहील.

वर नमूद केलेल्या पदांसाठी दिलेल्या अटींची पूर्तता करणाऱ्या इच्छुक व्यक्तींनी आपले खालील विहित नमुन्यातील अर्ज वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव आणि इतर तत्सम कागदपत्रांसह जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत आपले जिल्ह्यातील संबंधित जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्या कार्यालयात सादर करावेत. अधिक माहितीसाठी संबंधित जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच सदरची जाहिरात शासनाच्या www.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(अशोक काकडे) भा.प्र.से.

**आयुक्त,** महिला व बालविकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

महाराष्ट्र राज्यातील वर नमूद जिल्ह्यांसाठी बालकल्याण समितीसाठी अध्यक्ष/सदस्य या पदावर नियुक्ती करणेबाबत इच्छुक व्यक्तींचे नामनिर्देशन करण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज

१. नाव

२. जन्मतारीख (वय)

३. पत्ता, दूरध्वनी / मोबाईल क्रमांक / ई-मेल आयडी,

४. कोणत्या पदासाठी अर्ज करण्यात येत आहे (अध्यक्ष /सदस्य/दोन्ही पदांसाठी) जे लागू आहे तेथे बरोबर करावे.

५. शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | शैक्षणिक पात्रता | वर्ष | विद्यापीठाचे नाव | विषय | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|

www.fijs.co.in

६. शिक्षण, आरोग्य व कल्याण कार्याचा क्षेत्रातील बालकांसोबत काम करण्याचा अनुभव

| अ.क्र. | अनुभवः- शिक्षण, आरोग्य व कल्याणकारी क्षेत्रातील (बालकांशी निगडित कार्याचा कालावधी) | कार्यालयाचे नाव | यंत्रणेचे नाव | पदाचे नाव | थोडक्यात कार्य |
|---|---|---|---|---|---|

७. नोकरी / व्यवसायाबाबत तपशील, कार्यालयाचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक.

८. अर्जदार व्यक्तीचे बालकल्याण समितीवर काम करण्यासाठीचे संमतीपत्र.

९. अर्जदाराची इतर कोणत्याही समितीवर नियुक्ती झालेली आहे काय? असल्यास तपशील.

आपला विश्वासू

(स्वाक्षरी, संपूर्ण नाव व पत्ता)

डी.जी.आय.पी.आर. २०१८/२०१९/९७३

www.fjs.co